मुख्य अभियंता (यांत्रिकी) पदावर पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एसएलएस १३१७/(३९०/२०१७)/आ (वर्ग-१)
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १९.०१.२०१८.

वाचा - **सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र. ३१२ A/१६-ब, दि.२९.१२.२०१७.**

शासन आदेश:-

जलसंपदा विभागातील पुढील अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांना मुख्य अभियंता (यांत्रिकी) या पदावर `३७४००-६७००० + श्रेणीवेतन `८९००/- या वेतनश्रेणीत **तदर्थ /तात्पुरत्या स्वरूपात** पदोन्नती देण्यात येत आहे.

१. श्री.अशोक संतराम बोडके (अ.जा.)

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी अशा सूचना सामान्य प्रशासन विभाग /१६-ब कार्यासनाने दि.२९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत.

त्यानुसार सदर अधिकाऱ्यांची मुख्य अभियंता (यांत्रिकी) पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन असून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटींच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे -

१) सदर अधिकाऱ्यांविरूध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही.

२) सदर अधिकाऱ्यांचे जातवैधता प्रमाणपत्र संबंधित जातपडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

३. पदोन्नत झालेल्यावरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नियुक्ती सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे :

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१	श्री. अशोक संतराम बोडके	अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी मंडळ, नांदेड.	मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग , नाशिक.	पदोन्नतीने.

४. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्याने पदस्थापना केलेल्या पदावर तात्काळ रूजू व्हावे.

५. वरील पदोन्नत अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२०११४२१५५१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Jagdish Sajanikar

Digitally signed by Prashant Jagdish Sajanikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a8cd67058795ac5a961c2b41207cb6d24b79e17716af754c9fc40fd4145416f1, serialNumber=217003e42c820ec29c89162937f98929453cc6295b34f71ea285041053a66aa7, cn=Prashant Jagdish Sajanikar
Date: 2018.01.20 11:29:42 +05'30'

(प्रशांत साजणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. प्रधान सचिव (जलसंपदा)/सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. सर्व महासंचालक/कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.

७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.

८. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.

१०. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.

११. संबंधित अधिकारी (कार्यालय प्रमुखामार्फत).

१२. संबधित जिल्हा कोषागार अधिकारी.

१३. खाजगी सचिव, मा.मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.

१४. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.

१५. उप सचिव (का-१३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८. कार्यासन आ(वर्ग-१) संग्रहार्थ.